ePaper

**अजितदादांचा ठाकरे गटाला धक्का, अहमदनगरमधील नेत्याच्या हाती राष्ट्रवादीचा झेंडा!**



| वर्ष - 7 | अंक - 250 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- महाराष्ट्राच्या संघांची विजयी सलामी
- जुही चावलाची लेक दिसते सुंदर
- क्लासेससाठी नव्या मार्गदर्शक सूचना
- २० जानेवारीपर्यंत ५४ लाख प्रमाणपत्र

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 19 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# नदी पात्रात बेकायदा भराव टाकणाऱ्यांना पर्यावरण विभागाचा 'दंडुका'!

## »वाहने केली जप्त : 70 हजार रुपयांचा दंड वसूल

। पिंपरी । महाईन्यूज । ।

**पिंपळे गुरव येथील मोरया पार्क, कृष्णराज कॉलनी, अमृता कॉलनी, भाऊनगर, मुक्तांगण लॉन्स, देवकर पार्क, शिवनेरी कॉलनी या भागांतून वारंवार ट्रक, ट्रॅक्टर, डंपर, टेम्पो अशी वाहने भरुन राडारोडा नदीकाठी टाकला जात असल्याची तक्रार पर्यावरण विभागास प्राप्त झाली. त्यानंतर पर्यावरण विभागाने प्रत्यक्ष पाहणी करुन संबंधित वाहनचालकांवर कारवाई केली आहे.**









"नदीपात्रात भराव टाकल्यामुळे नदीचे पात्र अरूंद होत असून नदीप्रदूषण होत आहे. त्यामुळे यापुढे नदीपात्रात भराव टाकणाऱ्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या कारवाईसाठी महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या वतीने पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. पथकांमध्ये सुरक्षारक्षक आणि कामगारांचा समावेश असून नदीमध्ये भराव टाकणाऱ्या जागामालक, गाडी मालक, वाहन चालकावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच वाहनेही जप्त करण्यात येतील.

**-संजय कुलकर्णी,** सहशहर अभियंता, पर्यावरण विभाग.

नदीपात्रात भराव करणारे नितीन दर्शिले यांचे ४ हायवा ट्रक, दामोदर तळमट्टी यांचा ट्रॅक्टर, नागनाथ मंजुळे यांचा एक टेम्पो, लकाप्पा पुजारी यांचा एक टेम्पो, राठोड यांचा एक ट्रॅक्टर अशी आठ वाहने महापालिकेने जप्त केली आहेत. तसेच या वाहनमालकांकडून एकुण ७० हजार ५०० रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.

आयुक्त शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार आणि पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे सहशहर अभियंता संजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य निरीक्षक अमोल गोरखे तसेच मल्टिपर्पज वर्कर गोरक्षनाथ करपे यांनी ही कारवाई केली. या कारवाईमध्ये पर्यावरण पथकाचा तसेच एमएसएफ व मेस्को जवानांच्या पथकांचाही सहभाग होता.

# कचरा संकलनाच्या नावाखाली 'उधळपट्टी'

## »महापालिका प्रशासनचा कारभार : निविदा प्रक्रिया न राबवताच मुदतवाढ

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात घरोघरचा ओला व सुका कचरा वेगवेगळा जमा करण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. त्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाने तीन संस्थांची एका वर्षासाठी नेमणूक केली. त्यानंतर निविदा प्रक्रिया न राबविता त्या संस्थांना एक वर्षाची मुदतवाढ दिली. आता पुन्हा तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यासाठी तब्बल ५ कोटी ३७ लाख ८४ हजार ८८८ रुपयांचा खर्च होणार आहे..**



इंदोर शहराच्या धर्तीवर महापालिकेने ओला व सुका कचरा वेगवेगळा करण्यासाठी विविध संस्थांची नेमणूक केली होती. या संस्थांचे कर्मचारी नागरिकांमध्ये ओला व सुका कचरा वेगवेगळा करण्याबाबत जनजागृती करतात, असा महापालिकेचा दावा आहे. त्यासाठी इंदूर येथील बेसिक्स म्युनिसिपल वेस्ट व्हेंचर्स लि. या एजन्सीला अ, ड, ई आणि ह या एकूण चार क्षेत्रीय कार्यालयांचे काम देण्यात आले आहे.

डिव्हाइन मॅनेजमेंट ॲण्ड सर्व्हिसेसला ब, क आणि ग या तीन क्षेत्रीय कार्यालयांचे काम आहे.

जनवानीकडे फ क्षेत्रीय कार्यालयाचे काम आहे. या कामासाठी निविदा प्रक्रिया राबवून या तीन संस्थांना एका वर्षासाठी नेमण्यात आले होते. त्या संस्थांची एका वर्षाची मुदत संपली आहे.

### स्थायी समितीमध्ये आयुक्तांचीही मान्यता...

»मुदत संपलेली असतानाही आरोग्य विभागाने निविदा प्रक्रिया न राबवता त्या तीन संस्थांना थेट एका वर्षाची मुदतवाढ दिली. त्यानंतरही महापालिकेने निविदा प्रक्रिया राबविली नाही. त्यामुळे या तीन संस्थांना १ नोव्हेंबर २०२३ ते ३१ जानेवारी २०२४ अशी तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यासाठी तब्बल ५ कोटी ३७ लाख ८४ हजार ८८८ रुपये खर्च होणार आहे. मुदतवाढीसह या खर्चास आयुक्त शेखर सिंह यांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे.

# पवारांना भाजपाच्या चिन्हावर लढावं लागेल

## शिंदे यांना भाजपच्या चिन्हावर लढावे लागेल लिहून ठेवा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अॅग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टच्या वतीने बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्रात कृषी प्रदर्शनाची पाहणी आमदार रोहित पवारांनी केली. 18 ते 22 दरम्यान कृषी विज्ञान केंद्रात कृषी प्रदर्शन होणार आहे. या कृषी प्रदर्शनाला राज्यभरातून लोक येत असतात. ज्या प्रमाणे शेतकरी येत असतात त्याच प्रमाणे राजकिय नेते देखील येत असतात आज रोहित पवारांनी प्रदर्शनाची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रतिक्रिया दिली.**

शेतकऱ्यांना इथे नवीन प्रयोग पाहायला मिळत आहेत. उत्पन्न दुप्पट करायचा प्रयोग इथं होत आहे. पाण्याचं व्यवस्थापन करायचं, असं झालं तर दुष्काळातून बाहेर पडू शकतो, असे रोहित पवार म्हणाले. दाओसला ज्या कंपनीत काल करार केले, त्या सगळ्या कंपन्याचे ऑफिस मुंबईत आहेत. मग इथे करार का केला नाही? दाओस ला का जावे लागले? असा सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला. अदाणी यांना मुख्यमंत्री दावोसमध्ये भेटले, तिकडे भेटायचे कारण काय होत? गुजरातला 26 हजार कोटींची तरतूद येते, महाराष्ट्रमध्ये का येत नाही? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रावर वरून दबाव होता, जर महाराष्ट्रामध्ये उद्योग आले तर तिकडे काही राहणार नाहीत. मागच्या वर्षी एका कंपनीसोबत 3 कोटींचा करार केला. आणि करार दाखवले की 20 हजार कोटीचे करार करायचा म्हणून करू नका, असे रोहित पवार म्हणाले. केंद्रीय तपास यंत्रणा काम करीत असतात. धाड टाकली म्हणून आम्ही शांत बसलो नाही. मराठी घाबरत नाहीत. माझ्यावर कारवाई करणारे नेते हे मी जे व्यवसाय करतात तेच नेते असतील. आम्ही आधी व्यवसायात आलो मग राजकारणात आलो. चोरीचा पैसा राजकारणात वापरत नाही, तुम्ही व्यवसाय करून चोरीचा पैसा राजकारणात वापरतात, असा हल्लाबोल रोहित पवारांनी केला. भाजपकडे नेते नाहीत. जेव्हा शिंदे आणि अजित पवार मित्रमंडळींना मंत्रिपद मिळाले. भाजपकडे नेते नाहीत त्यामुळे बाकीच्या पक्षातील लोकांना भाजप घेते. भाजपचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत, असे रोहित पवार म्हणाले. अजित पवारांचा व्हिडीओ पाहून वाईट वाटलं. रुबाब आहे पण तो रूबाब सोडू नये. भाजप त्यांची ताकद कमी करायचा प्रयत्न करत आहे असे तो व्हिडीओ बघून वाटतं, असे रोहित पवार म्हणाले.

भाजपला लोकनेते आवडत नाही.भाजपने अनेक लोकांची ताकद कमी केली, त्यांच्याच नेत्यांची ताकद कमी केली. अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांना भाजपच्या चिन्हावर लढावे लागेल लिहून ठेवा, असे रोहित पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचा आश्चर्यकारक निकाल लागेल. लोकांच्या मनात आहे तो निकाल लागेल. ज्याअर्थी भाजप नेते म्हणतात अजित पवार यांच्या बाजूने निकाल लागेल, लिहून ठेवा त्याअर्थी तसा निकाल लागणार नाही, असा विश्वास रोहित पवारांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांना इथे नवीन प्रयोग पाहायला मिळत आहेत. उत्पन्न दुप्पट करायचा प्रयोग इथं होत आहे. पाण्याचं व्यवस्थापन करायचं, असं झालं तर दुष्काळातून बाहेर पडू शकतो, असे रोहित पवार म्हणाले. दाओसला ज्या कंपनीत काल करार केले, त्या सगळ्या कंपन्याचे ऑफिस मुंबईत आहेत. मग इथे करार का केला नाही? दाओस ला का जावे लागले? असा सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला. अदाणी यांना मुख्यमंत्री दावोसमध्ये भेटले, तिकडे भेटायचे कारण काय होत? गुजरातला 26 हजार कोटींची तरतूद येते, महाराष्ट्रमध्ये का येत नाही? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रावर वरून दबाव होता, जर महाराष्ट्रामध्ये उद्योग आले तर तिकडे काही राहणार नाहीत. मागच्या वर्षी एका कंपनीसोबत 3 कोटींचा करार केला. आणि करार दाखवले की 20 हजार कोटीचे करार करायचा म्हणून करू नका, असे रोहित पवार म्हणाले. केंद्रीय तपास यंत्रणा काम करीत असतात. धाड टाकली म्हणून आम्ही शांत बसलो नाही. मराठी घाबरत नाहीत. माझ्यावर कारवाई करणारे नेते हे मी जे व्यवसाय करतात तेच नेते असतील. आम्ही आधी व्यवसायात आलो मग राजकारणात आलो. चोरीचा पैसा राजकारणात वापरत नाही, तुम्ही व्यवसाय करून चोरीचा पैसा राजकारणात वापरतात, असा हल्लाबोल रोहित पवारांनी केला. भाजपकडे नेते नाहीत. जेव्हा शिंदे आणि अजित पवार मित्रमंडळींना मंत्रिपद मिळाले.



### आमच्या बाजूने निकाल लागेल

भाजपकडे नेते नाहीत त्यामुळे बाकीच्या पक्षातील लोकांना भाजप घेते. भाजपचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत, असे रोहित पवार म्हणाले. अजित पवारांचा व्हिडीओ पाहून वाईट वाटलं. रुबाब आहे पण तो रूबाब सोडू नये. भाजप त्यांची ताकद कमी करायचा प्रयत्न करत आहे असे तो व्हिडीओ बघून वाटतं, असे रोहित पवार म्हणाले. भाजपला लोकनेते आवडत नाही.भाजपने अनेक लोकांची ताकद कमी केली, त्यांच्याच नेत्यांची ताकद कमी केली. अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांना भाजपच्या चिन्हावर लढावे लागेल लिहून ठेवा, असे रोहित पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचा आश्चर्यकारक निकाल लागेल. लोकांच्या मनात आहे तो निकाल लागेल. ज्याअर्थी भाजप नेते म्हणतात अजित पवार यांच्या बाजूने निकाल लागेल, लिहून ठेवा त्याअर्थी तसा निकाल लागणार नाही, असा विश्वास रोहित पवारांनी व्यक्त केला.

# वाहन उद्योगातील नवतंत्रज्ञान उलगडणार!

## ‘एआरएआय’च्या वतीने सिअॅट 2024 चे पुण्यात आयोजन

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाहन उद्योगातील नवतंत्रज्ञान उलगडून दाखविणाऱ्या १८ व्या सिम्पोझियम ऑन इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह टेक्नोलॉजी अर्थात सिअॅट २०२४ चे आयोजन २३ ते २५ जानेवारी दरम्यान करण्यात आले आहे. भारतीय वाहन उद्योगाची नियामक संस्था असलेल्या ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडियाने (एआरएआय) ही द्विवार्षिक परिषद आयोजित केली आहे. ही परिषद मोशी येथील पुणे इंटरनॅशनल एक्सिबिशन अँड कन्व्हेंशन सेंटर (पीआयईसीसी) येथे होईल.**

एआरएआयचे संचालक आणि सिअॅट २०२४ चे अध्यक्ष डॉ. रेजी मथाई यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी एआरएआयचे वरिष्ठ उपसंचालक व सिअॅटचे निमंत्रक विक्रम शिंदे, एआरएआयचे उपसंचालक व सिअॅट एक्स्पोचे समन्वयक विजय पंखावाला, एआरएआयचे वरिष्ठ उपसंचालक नितीन धांडे व आनंद देशपांडे, डॉ. सुकृत ठिपसे आदी उपस्थित होते. सिअॅट २०२४ चे उद्घाटन केंद्रीय अवजड उद्योग मंत्री डॉ. महेंद्र नाथ पांडे यांच्या हस्ते होणार आहे. प्रगतीशील गतिशीलतेच्या दिशेने परिवर्तन ही परिषदेची यावर्षीची संकल्पना आहे.

यासोबतच अत्याधुनिक एनव्हीएच विकास केंद्र, ऑक्सिलरेटेड स्लेड लॅब, फोटोमेट्री प्रयोगशाळा, मोबिलिटी रिसर्च सेंटर (एमआरसी), टाकवे येथे उभारण्यात येत असलेली एडीएएस प्रणाली, सिलिंडर चाचणी आणि हाय एनर्जी इंम्पॅक्ट टेस्टिंग सुविधा यासारख्या नवीन सुविधांचे उद्घाटनही यावेळी होईल, असे डॉ. मथाई यांनी सांगितले.सिअॅट २०२४ मध्ये होणाऱ्या परिसंवादांत दीड हजारहून अधिक वाहनउद्योग क्षेत्रातील तंत्रज्ञ सहभागी होतील. नऊ देशांतील तांत्रिक तज्ज्ञ हे ४८ तांत्रिक सत्रांमध्ये त्यांचे संशोधनकार्य येथे सादर करतील आणि त्यावर चर्चाही करतील. याव्यतिरिक्त सिअॅटच्या संकल्पनेवर विविध चर्चासत्रांचे आयोजनही करण्यात आले असल्याची माहिती विक्रम शिंदे यांनी दिली.एआरएआयचे संचालक आणि सिअॅट २०२४ चे अध्यक्ष डॉ. रेजी मथाई यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी एआरएआयचे वरिष्ठ उपसंचालक व सिअॅटचे निमंत्रक विक्रम शिंदे, एआरएआयचे उपसंचालक व सिअॅट एक्स्पोचे समन्वयक विजय पंखावाला, एआरएआयचे वरिष्ठ उपसंचालक नितीन धांडे व आनंद देशपांडे, डॉ. सुकृत ठिपसे आदी उपस्थित होते. सिअॅट २०२४ चे उद्घाटन केंद्रीय अवजड उद्योग मंत्री डॉ. महेंद्र नाथ पांडे यांच्या हस्ते होणार आहे. प्रगतीशील गतिशीलतेच्या दिशेने परिवर्तन ही परिषदेची यावर्षीची संकल्पना आहे. यासोबतच अत्याधुनिक एनव्हीएच विकास केंद्र, ऑक्सिलरेटेड स्लेड लॅब, फोटोमेट्री प्रयोगशाळा, मोबिलिटी रिसर्च सेंटर (एमआरसी), टाकवे येथे उभारण्यात येत असलेली एडीएएस प्रणाली, सिलिंडर चाचणी आणि हाय एनर्जी इंम्पॅक्ट टेस्टिंग सुविधा यासारख्या नवीन सुविधांचे उद्घाटनही यावेळी होईल, असे डॉ. मथाई यांनी सांगितले.



## स्पर्श हॉस्पिटलला उर्वरित बील अदा करण्याचे आदेश


# महापालिकेला मुंबई उच्च न्यायालयाचा दणका!

### कथित घोटाळा : स्पर्शला 'रिकव्हरी बीलां' साठी स्वतंत्र याचिका दाखल करण्याची अट

। पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महानगरपालिका विरुद्ध स्पर्श हॉस्पिटलच्या 'रिकव्हरी बीला' बद्दल स्वतंत्र याचिका दाखल करण्याच्या अटीवर स्पर्श हॉस्पिटल संस्थेस कोरोना काळातील थकीत बिले तीन आठवड्याच्या मुदतीमध्ये अदा करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे स्पर्श हॉस्पिटल संस्थेला दिलासा मिळाला आहे.**



908-ASWP-9698-2023.DOC

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
CIVIL APPELLATE JURISDICTION
WRIT PETITION NO. 9698 OF 2023

Fortune's Sparsh Healthcare Pvt Ltd Through its Chief Executive Officer ...Petitioner
*Versus*
The State of Maharashtra Through Principal Secretary & Anr ...Respondents

Mr Ashutosh Kulkarni, *with Vrushali Maindad, Shaheen Kapadia & Shrushti Tupe, for the Petitioner.*
Mrs MP Thakur, AGP, *for the Respondent-State.*
Mr Kedar B Dighe, *with Archana D Gaware, for Respondent No. 2.*

CORAM G.S. Patel & Kamal Khata, JJ.
DATED: 4th January 2024

PC:-

1. Mr Kulkarni states that there is an Additional Affidavit in Reply. In this Affidavit in paragraph 17, the assertion on behalf of the contesting Respondents the Pimpri Chinchwad Municipal Corporation, is that for two other units, the Petitioner has been overpaid. These are the Covid centres known as Hira Lawns and Rama Smruti Covid Centre. The submission is that the amount paid in excess will need to be adjusted, and after calculating the exact amount due and payable, the balance can be paid over to the Petitioner. Mr Kulkarni and his Advocate on record have specific

Page 1 of 2
4th January 2024

908-ASWP-9698-2023.DOC

instructions to state that this statement may be accepted, reserving to the petitioner's the liberty to separately and independently challenge the assertion of an excess payment for the other two centres. Annexed to this Affidavit is an order of 2nd January 2024 at page 212.

2. Mr Dighe also states that there is an amount of deposit which will also have to be adjusted. This may also be done on a without prejudice basis.

3. Accordingly, and at Mr Kulkarni's request, we dispose of the Petition in these terms but specifically reserving to the Petitioner the liberty to separately take appropriate proceedings in regard to the alleged overpayment, illegal/excess payment for the other two Covid centres.

4. Having said this, the amount that is found due after adjustment (and which is obviously on a without prejudice basis) is to be computed within a period of three weeks from today, and that disbursement is to be made within a period of three weeks thereafter.

5. Petition is disposed of in these terms.

(G. S. Patel, J)

(Kamal Khata, J)

कोरोना काळात स्पर्श हॉस्पिटल या संस्थेला महापालिकेद्वारे ऑटो क्लस्टर कोविड केअर सेंटर चालविण्याबद्दल त्यांनी दाखल केलेल्या थकीत बिलासंदर्भात हा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. स्पर्श हॉस्पिटल या संस्थेने महानगरपालिकेने ऑटो क्लस्टर हे चालविण्याबद्दल निविदा मागितल्या होत्या त्या निवेद्यमध्ये स्पर्श हॉस्पिटल ही संस्था लघुत्तम दरामध्ये प्रथम क्रमांक आली होती. त्या अनुषंगाने महापालिकेतर्फे त्यांना लघुत्तम दरामध्ये ऑटो क्लस्टर कोविड केअर सेंटर येथे काम करण्याचे आदेश प्राप्त झाले सदरील ऑटो क्लस्टर कोविड हेअर सेंटर स्पर्श संस्थेने दहा महिने कालावधीपर्यंत चालविले. मात्र, स्पर्श हॉस्पिटलचे उर्वरित थकीत बिले महानगरपालिकेने राखून ठेवली होती त्या सर्व संदर्भात स्पर्श संस्थेने मुंबई उच्च न्यायालयाकडे महानगरपालिका विरुद्ध याचिका दाखल करत धाव घेतली होती

या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने महानगरपालिकेला यासंदर्भात खुलासा मागविला असता महानगरपालिकेतर्फे दि. २ जानेवारी २०२४ रोजी आयुक्तांमार्फत पत्राद्वारे असा खुलासा देण्यात आला की, स्पर्श हॉस्पिटल या संस्थेला हिरा लॉन्स व राम स्मृती लॉन्स येथे असलेल्या स्पर्श संस्थेद्वारा कार्यान्वित असलेल्या कोविड केअर सेंटर यासाठी ३ कोटी २९ लाख ५४४ रुपये एव्हढे बीले अदा केली होती. मात्र, या कोविड केअर सेंटर संदर्भात घोटाळ्याचे आरोप झाले. याबद्दल महापालिका आयुक्तांनी विभागीय आयुक्त यांच्यामार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले होते. सदर समितीच्या अहवालामध्ये महानगरपालिकेच्या कार्यकालिन पद्धतीबद्दल ताशेरे ओढले आहेत.

### राजेश पाटील यांची कार्यवाही... शेखर सिंहांना चुकीची वाटते?

» महापालिकेच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी व आरोग्य अधिकारी यांच्या जाणीवपूर्वक केलेल्या टिप्पणी बद्दल महापालिकेला जाब विचारण्यात आला होता तत्कालीन अतिरिक्त आयुक्त यांनी आरोग्य अधिकारी व मुख्य वैद्यकीय अधिकारी तसेच लेखापाल या सर्व पदाधिकाऱ्यांच्या टिप्पणी बद्दल साशंकता दिसून येत असल्याकारणाने सर्व टिप्पणी यांना 'ओव्हर रुल' करून तत्कालीन आयुक्तांच्या आदेशावरून सर्व गोष्टींबद्दल शहानिशा व वस्तू परिस्थिती लक्षात घेऊन चौकशी समिती नेमून त्यांच्या शिफारशीद्वारे स्पर्श हॉस्पिटल व इतर संस्थांना कायद्याच्या चौकटीमध्ये बिले अदा करण्याचे आदेश देण्यात आले व त्या आदेशाप्रमाणे महापालिकेतर्फे स्पर्श संस्थेची हिरा व मोती या दोन्ही सेंटरची बिले रीतसर अदा केलेली होती. मात्र, तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत विद्यमान आयुक्त शेखर सिंह यांना साशंकता असल्यामुळे सिंह यांनी न्यायालयामध्ये 'रिकव्हरी' बाबत खुलासा केल्याचे दिसून येते.

### न्यायालयाचा निर्णय काय आहे?

» मुंबई उच्च न्यायालयाने स्पर्श संस्थेने दाखल केलेल्या थकीत बिलांच्या संदर्भातील दाखल केलेल्या याचिकेवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांना खुलासा मागविला. विद्यमान आयुक्त शेखर सिंह यांनी दि. २ जानेवारी २०२४ रोजी दिलेल्या पत्रांमध्ये वरील सर्व बाबींचा उल्लेख करत स्पर्श हॉस्पिटल या संस्थेकडे ३ कोटी २९ लाख इतक्या रकमेची रिकव्हरी असल्याबाबतची शक्यता व्यक्त केली आणि उर्वरित रक्कम देण्याचे मान्य केले. त्यावर मुंबई उच्च न्यायालयाने तथाकथित 'रिकव्हरी' असलेल्या रकमेविरुद्ध स्पर्श संस्थेला महानगरपालिकेविरुद्ध स्वतंत्र याचिका दाखल करण्याचे अटीवर उर्वरित रक्कम ही स्पर्श संस्थेला देण्याचे आदेश महापालिका प्रशासनाला दिले आहेत.

---

# टीडीआर घोटाळा : अजित पवारांच्या डोळ्यांवर पट्टी!

### एकनाथ पवार यांची टीका : शिवसेना ठाकरे गटाची पत्रकार परिषद

।पिंपरी।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पालकमंत्री अजित पवार जिल्हा चालवत आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेत करोडो रूपयांचा भ्रष्टाचार होत असताना ते आंधळ्यासारखी डोळ्यावर पट्टी बांधून बसलेत का, हा माझा सवाल आहे. महापालिकेत दीड हजार कोटी रूपयांचा टीडीआर घोटाळा होत असेल आणि पालकमंत्री त्यामध्ये पाणी मुरत असल्याचे सांगत आहेत. मग तुम्ही कसले पालकमंत्री आहात, असा सवाल शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे राज्य संघटक एकनाथ पवार यांनी केला.**



युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे हे रविवारी पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर आहेत. त्याबाबतची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मावळचे संघटक संजोग वाघेरे, शहरप्रमुख सचिन भोसले, जिल्हाप्रमुख गौतम चाबुकस्वार, महिला संघटिका सुलभा उबाळे, उपजिल्हाप्रमुख नीलेश मुटके, माजी नगरसेविका मीनल यादव यावेळी उपस्थित होते.

एकनाथ पवार म्हणाले की, पुढचे 30 वर्षांसाठी शिवसेनेला चांगले दिवस येणार आहेत. मावळचा खासदार उद्धव ठाकरे यांचा निष्ठावान शिवसैनिक होणार आहे. महापालिकेतही आमचीच सत्ता येणार आहे. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेकजण पक्षात येण्यास इच्छुक आहे. शिरूरचा खासदारही महाविकास आघाडीचाच होणार आहे. शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे आमदार निवडून येतील.

चाबुकस्वार म्हणाले की, शिवसेना ज्या पद्धतीने फोडली. जो निकाल विधानसभा अध्यक्ष यांनी दिला आहे. त्याचा पर्दाफाश केला जाणार आहे. जनतेच्या दरबारात जाऊन निकालाची चिरफाड केली जाणार आहे. लोकशाहीचा गळा घोटला जात आहे. भाजपच्या हुकुमशाही विरोधात शिवसेना लढत आहे. 'महा न्याय, महानिष्ठा' सभा होणार आहे.


> टीडीआर घोटाळा होत आहे. महापालिकेत करोडो रुपयांचा घोटाळा होत असताना पालकमंत्री अजित पवार डोळ्यावर पट्टी लावून बसले आहेत का, कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाला असताना पालकमंत्री गप्प का आहेत. अनेकजण रांगेत आहेत, नजीकच्या काळात पक्ष प्रवेश होतील. आता सुरुवात झाली आहे.
> **- एकनाथ पवार,** राज्य संघटक, शिवसेना उबाठा..




# ‘एक चीन धोरणा’चा फेरविचार हवा

**भारत, अमेरिकेसह अनेक देशांनी ‘एक चीन धोरणा’चा (वन चायना पॉलिसी) स्वीकार केला आहे. या धोरणाचा अर्थ असा की, जगात एकच चीन आहे; तैवान हा चीनचा अविभाज्य भाग आहे. पण जो देश इतरांचे सार्वभौमत्व, त्यांना वाटणाऱ्या सुरक्षाविषयक चिंता या कशाचीच फिकीर करीत नाही, त्या देशाच्या भूमिकेवर आपणही प्रश्नचिन्ह का लावू नये?**

इतिहासात काही वळणे अशी येतात की, त्यावेळी पारंपरिक भूमिकांचा नव्याने विचार करावा लागतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर चीनच्या बाबतीत तशी वेळ आली आहे का, हा प्रश्न त्यामुळेच उपस्थित करावासा वाटतो. भारत, अमेरिकेसह अनेक देशांनी ‘एक चीन धोरणा’चा (वन चायना पॉलिसी) स्वीकार केला आहे. या धोरणाचा अर्थ असा की, जगात एकच चीन आहे. तैवान हा चीनचा अविभाज्य भाग आहे. पण जो देश इतरांचे सार्वभौमत्व, त्यांना वाटणाऱ्या सुरक्षाविषयक चिंता या कशाचीच फिकीर करीत नाही, त्या देशाच्या भूमिकेवर आपणही प्रश्नचिन्ह का लावू नये?तैवानमधील निवडणुकीत स्वातंत्र्यवादी पक्ष निवडून आल्याने या प्रश्नाची निदान चर्चा तरी व्हायला हवी. तैवानच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ‘डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी’च्या (डीपीपी) विल्यम लाय चिंग-ते यांचा विजय झाला आहे. थोडी



टक्केवारी कमी झाली असली तरी हा सलग तिसरा विजय महत्त्वाचाच. तैवान हा ‘स्वतंत्र आणि सार्वभौम’ राष्ट्र असल्याची ‘डीपीपी’ची भूमिका आहे. पाश्चात्य राष्ट्रांनी लाय चिंग-ते यांचे अभिनंदन केले. परंतु भारत, अमेरिकेसह जवळपास सगळ्या राष्ट्रांनी ‘एक चीन धोरण’ मान्य केले असून त्यात बदल नाही. ११ राष्ट्रांचे तैवानशी राजनैतिक संबंध आहेत.नौरु नावाच्या जवळपास १२,५०० लोकसंख्या असलेल्या देशाने निकालानंतर तैवानशी असलेले राजनैतिक संबंध तोडले आणि चीनशी प्रस्थापित केले. लाय चिंग-ते यांच्या विजयानंतर चीनने व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे, की तैवानचा मुद्दा ही चीनची अंतर्गत बाब आहे. तैवानमध्ये बदल होत असले तरी जगात मात्र एकच चीन आहे. स्वतंत्र तैवान आणि "दोन चीन" ला चीनचा विरोध असल्याचे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने तैवानच्या निकालानंतर स्पष्ट केले. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग तैवानला चीनमध्ये लवकरच सामील करण्यात येईल, असे नेहमी सांगत असतात.अमेरिकेची तैवानला वाचवण्याची भूमिका असल्याने चीन-अमेरिकेत तणाव आहे. उभय राष्ट्रांत असलेल्या तणावाच्या अनेक कारणांपैकी तैवान एक आहे. अमेरिकी प्रतिनिधिगृहाच्या सभापती नॅन्सी पेलोसी यांनी २०२२च्या ऑगस्ट महिन्यात तैवानचा दौरा केला होता आणि त्यामुळे चीनचे पित्त आणखीनच खवळले. अमेरिका व चीनमध्ये प्रचंड तणाव निर्माण झाला होता. अमेरिकेचा तैवानच्या लोकशाहीला पाठिंबा असल्याचे वक्तव्य पेलोसी यांनी तेव्हा केले होते. १९९७ नंतर तैवानचा दौरा करणाऱ्या नॅन्सी पेलोसी अमेरिकेच्या पहिल्या वरिष्ठ नेत्या होत्या. काँग्रेसचे खासदार मनीष तिवारी यांनी पेलोसी यांच्या तैवानच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी खासदारांचे एक शिष्टमंडळ तैवानला गेले पाहिजे, अशी सूचना केली होती. २०२२च्या ऑगस्ट महिन्यात चीनचे दिल्लीतील राजदूत सुन वेडोंग यांनी म्हटलं, की चीनची अपेक्षा आहे की भारत ‘एक चीन धोरणा’च्या बाजूला कायम राहील आणि पेलोसींच्या दौऱ्यामागील ‘दुष्ट राजकीय हेतू’ समजून घेईल. ‘एक चीन धोरणा’मुळे भारताचे तैवानशी संबंध असले तरी ते राजनैतिक स्वरुपाचे नाहीत. नवी दिल्ली येथे तैवानचे कार्यालय आहे; पण त्याला दूतावास म्हटले जात नाही. ‘तैपेई इकॉनोमिक अँड कल्चरल सेंटर’ असे नाव त्याला देण्यात आले आहे. कामाचे स्वरूप मात्र दूतावासारखेच आहे. चीनमध्ये अनेक वर्षांच्या यादवी युद्धानंतर १९४९ ला माओ-त्से-तुंग यांच्या नेतृत्वाखालील कम्युनिस्ट पक्षाने विजय मिळवला. त्यानंतर विरोधी नेते चँग-कै-शेक यांच्या नेतृत्वाखालील लोक तैवानला पळून गेले. सुरुवातीला ‘रिपब्लिक ऑफ चायना (तैवान) संयुक्त राष्ट्रांचा सदस्य होता. पण चीनचा वाढता प्रभाव आणि अमेरिकेसोबत सुधारलेल्या संबंधांमुळे ऑक्टोबर १९७१ मध्ये ‘पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना’ (चीन) ला संयुक्त राष्ट्रांचे सदस्यत्व देण्यात आले.

## संपादकीय »

### आहे महाराष्ट्र परी

***केंद्राच्या पाठिंब्यामुळे महाराष्ट्रासाठी परिस्थिती प्रतिकूल नसली तरी ती अत्यंत अनुकूल आहे असेही नाही, हे आपले राज्यकर्त्यांनी ओळखल्यास बरे...***

दावोस येथे आल्प्सच्या बर्फाच्छादित कुशीत गुंतवणूकदार, उद्योगपती आणि धोरणकर्त्यांच्या वार्षिक कुंभमेळयात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री काही हजार कोटी रुपयांच्या गुंतवणूक वायद्यांची घोषणा करीत असताना त्याच वेळी दिल्लीतून महाराष्ट्र नवउद्यमींच्या गुंतवणुकीत मागे पडल्याची वार्ता ही दावोसोत्सवाचा बर्फ वितळवणारी ठरते. अलीकडे हे महाराष्ट्राच्या बाबत वारंवार होऊ लागले आहे हे कटुसत्य. एखादा प्रकल्प या राज्यातून दुसरीकडे जाणे इतक्यापुरतेच ते मर्यादित नाही. तेलंगणा आणि गुजरात या राज्यांनी व्यापार-उद्योगस्नेहतेच्या मुद्दयावर महाराष्ट्रास मागे टाकले. वर्षी ‘निती आयोग’रचित ‘निर्यातस्नेही’ राज्यांच्या गुणवत्ता तालिकेत गुजरात हा सहोदर आपल्यापेक्षा पुढे गेल्याचे दिसले. त्याही आधी उद्योगस्नेही धोरणांत अन्य राज्ये महाराष्ट्रावर सातत्याने मात करत असल्याचे दिसून आले.

**देशातील अनेक राज्ये गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी एकमेकांशी स्पर्धा करीत वेगाने विकसित होत आहेत. त्यासाठी गुंतवणूक परिषद आयोजित करीत आहेत. उत्तर प्रदेश, ओडिशा, गुजरात यांसारखी राज्ये अर्थव्यवस्था आणि रोजगार वाढवण्याला प्रोत्साहन देत आहेत.**

# विदर्भावरील ‘मागासपणा’चा डाग

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील विदर्भात गुंतवणुकीच्या अनेक संधी आहेत.पंतप्रधानांच्या पाच लाख कोटी (पाच ट्रिलियन डॉलर्स) अर्थव्यवस्थेच्या स्वप्नपूर्तीसाठी जास्तीत जास्त योगदान विदर्भ देऊ शकतो. विदर्भात औद्योगिकीकरणासाठी मोठ्या प्रमाणात संसाधने असल्याने उद्योग जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनतील. नवीन भांडवल निर्माण करण्यास मदत होऊ शकेल अशा विदर्भातील संसाधनांमध्ये मूल्यवर्धनाची प्रचंड क्षमता आहे. काही उदाहरणे पुढीलप्रमाणे.विदर्भातील लांब धाग्यासाठी आवश्यक असा उच्च दर्जाचा कापूस सध्या जगभरात निर्यात केला जातो. पंतप्रधान आणि निती आयोगाने देशात सात मेगा टेक्स्टाइल पार्कची घोषणा केली आहे. विदर्भातील अमरावती जिल्ह्याची क्षमता पाहता हा जिल्हा टेक्स्टाइल पार्कसाठी निवडला गेला आहे कारण तिथे २०० किमी परिसरात कापसाचे पीक घेतले जाते. पंतप्रधानांनी वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी फार्म-फायबर-फॅब्रिक-फॅशन-फॉरेक्स



हे ‘फाइव्ह एफ’चे सूत्र दिले आहे. विदर्भातील टेक्स्टाइल पार्कमधून जास्तीत जास्त फायदा मिळवता येईल. उर्वरित सहा टेक्स्टाइल पार्क इतर राज्यांमध्ये आहेत. वस्त्रोद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी निर्यातीसाठी १८० अब्ज डॉलरचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवले आहे. विदर्भात देशातील सर्वात मोठ्या टेक्स्टाइल पार्कसाठी लागणारे सगळे काही आहे. उदा. बुटीबोरी येथील एक कोटी टनाचा पॉलिस्टर प्रकल्प, १८००० मेगावॉट वीज, सर्वोत्कृष्ट अभियंते, सर्वोत्तम निर्यातीसाठी पायाभूत सुविधा.. मागील दोन-तीन वर्षांपासून राज्य आणि केंद्र सरकारने गडचिरोली जिल्ह्यावर लक्ष केंद्रित केले आहे. जिल्ह्यात १२ दशलक्ष टन लोहखनिज खाण उत्पादन करण्याचे सरकारचे प्रयत्न आहेत. आता राज्य सरकार आणि खाण कंपनीने आठ-दहा दशलक्ष टन क्षमतेच्या एकात्मिक स्टील प्रकल्पाची स्थापना करण्यासाठी २० हजार कोटींचे सामंजस्य करार केले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीला भारतातील भावी स्टील सिटी म्हणून घोषित केले आहे. यासाठी गडचिरोलीपर्यंत विस्तारित रेल्वे नेटवर्क, समृद्धी द्रुतगती मार्ग उभारण्याचे नियोजन आहे. आणखी सहा-सात खाणपट्टे स्टील क्षेत्रातील प्रस्थापित कंपन्यांना देण्यात आले आहेत. त्या गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करू शकतात. गडचिरोली जिल्ह्यात दोन मोठ्या सिमेंट कंपन्याही गुंतवणूक करत आहेत.भारत सरकार, पंतप्रधान कार्यालय आणि निती आयोग ‘सक्र्युलर इकॉनॉमी’ला चालना देण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्यातून मूळ संसाधनांचे जतन आणि टाकाऊ घटकांचे संपत्तीत रूपांतर करणे शक्य आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला 'महाईन्यूज'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 20 जानेवारीपर्यंत 54 लाख प्रमाणपत्र द्या

## मनोज जरांगे पाटलांचा सरकारला इशारा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**५४ लाख मराठ्यांना प्रमाणपत्र वाटप करा, मग सगे-सोयऱ्यांचा वटहुकूम काढा. सरकार हैद्राबाद संस्थान, सातारा संस्थान व मुंबई गॅझेट का स्वीकारत नाही. त्यांना ते मान्य नाही का? मग नागपूर करार कसा मान्य होतो. तोही रद्द करा? असे मनोज जरांगे यांनी सरकारच्या शिष्टमंडळाला ठणकावून सांगत सवाल उपस्थित केला.**




तसेच २० जानेवारीपर्यंत ५४ लाख प्रमाणपत्र द्या, आमच्यावर मुंबईला येण्याची वेळ येऊ देऊ नका, अन्यथा मराठे मुंबईत आंदोलनाला बसल्यास तेथून उठणार नाहीत, असा इशारा जरांगे पाटील यांनी यावेळी सरकारच्या शिष्टमंडळाला दिला. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी अध्यादेशाच्या मसुद्यातील सगे-सोयरे शब्दाबाबत सरकारला सुचवलेल्या दुरुस्तीनुसार नवीन सुधारित मसुदा घेऊन शिष्टमंडळ आज (दि.१८) अंतरवालीत दाखल झाले. आ. बच्चू कडू, मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव मंगेश चिवटे यांनी मनोज जरांगे यांना सुधारित मसुदा सुपूर्द केला. त्यावर मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली. यावेळी बोलताना म्हणून जरांगे म्हणाले की, ज्यांची कुणबी नोंद आढळली आहे. त्यांची यादी ग्रामपंचायतमध्ये लावा. तुम्हाला मराठवाड्याचं १८८४ चं गॅझेट मान्य नाही का? गॅझेटमध्ये मराठवड्यात एकही मराठा नाही, सगळे कुणबी आहेत. हे गॅझेट का मान्य नाही? ५४ लाख लोकांना कुणबी प्रमाणपत्र द्या तरच अध्यादेशाचा कागद कामाचा असेल, असे जरांगे यावेळी म्हणाले.यावर आ. बच्चू कडू म्हणाले की, जिथे कुणबी नोंदी सापडल्या आहेत तिथेच यादी लागेल, याद्या ग्रामपंचायतमध्ये लागल्या आहेत. गॅझेटचा विषय वेगळा आणि सग्या-सोयऱ्याचा विषय वेगळा. ज्या लोकांना कुणबी प्रमाणपत्र हवं आहे, त्यांना अर्ज करावाच लागेल, सही करावीच लागेल तरच त्यांना प्रमाणपत्र मिळेल, असे आ. बच्चू कडू जरांगेंना म्हणाले. प्रशासन म्हणत आहे की, गावात ग्रामपंचायतमध्ये याद्या लावल्या आहेत, अंबड तालुक्यातील वडीकाळया गावात कुणबी नोंदी सापडल्या असूनही ग्रामपंचायतमध्ये यादी लावण्यात आली नाही, असे जरांगेनी बच्चू कडू यांना सांगितले. त्यानंतर आ. कडू यांनी अंबडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना झापले. सुधारित मसुद्यावरील निर्णय शुक्रवारी (दि. १९) १२ वाजेपर्यंत तुम्हाला कळवतो, असे मंगेश चिवटे यांनी सांगितले. यावर जरांगे म्हणाले, २० जानेवारीपर्यंत ५४ लाख कुणबी प्रमाणपत्र द्या नाहीतर तुम्हीही माझ्यासोबत मुंबईला आंदोलनात चला. आमच्यावर मुंबईला येण्याची वेळ येऊ देऊ नका, अन्यथा मराठे मुंबईत आंदोलनात बसले तर तेथून उठणार नाहीत, असा इशाराही मनोज जरांगे यांनी मंगेश चिवटे यांना दिला.५४ लाख मराठ्यांना त्यांच्या नातेवाईकांना प्रमाणपत्र द्या, किती लोकांना प्रमाणपत्र दिले याचा आकडा किती आहे याची माहिती द्या, २० जानेवारीला मराठे मुंबईला जाण्यासाठी तयार आहेत. गॅझेट हे ग्राहय धरायला तयार नसेल तर मग नागपूर करार रद्द करा, एक मंत्री माझ्यावर ट्रॅप लावत आहे. गरज पडल्यास त्याच नाव जाहीर करीन. आरक्षण दिलं तरी मुंबईला जाणार, नाही दिलं तरी जाणार असल्याचे सांगत २० जानेवारीला अंतरवालीतून मुंबईकडे निघणार, असल्याचे मनोज जरांगे – पाटील यांनी स्पष्ट केले.ज्या ज्या ग्रामपंचायतवर कुणबी नोंदी सापडलेल्या आहेत तरीही याद्या लावण्यात आल्या नाहीत. तेथील ग्रामसेवक, तहसिलदार व नायब तहसिलदार यांना निलंबित करा.

### सग्या-सोयऱ्याचा विषय वेगळा

अन्यथा मराठे मुंबईत आंदोलनाला बसल्यास तेथून उठणार नाहीत, असा इशारा जरांगे पाटील यांनी यावेळी सरकारच्या शिष्टमंडळाला दिला. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी अध्यादेशाच्या मसुद्यातील सगे-सोयरे शब्दाबाबत सरकारला सुचवलेल्या दुरुस्तीनुसार नवीन सुधारित मसुदा घेऊन शिष्टमंडळ आज (दि.१८) अंतरवालीत दाखल झाले. आ. बच्चू कडू, मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव मंगेश चिवटे यांनी मनोज जरांगे यांना सुधारित मसुदा सुपूर्द केला. त्यावर मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली.यावेळी बोलताना म्हणून जरांगे म्हणाले की, ज्यांची कुणबी नोंद आढळली आहे. त्यांची यादी ग्रामपंचायतमध्ये लावा. तुम्हाला मराठवाड्याचं १८८४ चं गॅझेट मान्य नाही का? गॅझेटमध्ये मराठवड्यात एकही मराठा नाही, सगळे कुणबी आहेत. हे गॅझेट का मान्य नाही? ५४ लाख लोकांना कुणबी प्रमाणपत्र द्या तरच अध्यादेशाचा कागद कामाचा असेल, असे जरांगे यावेळी म्हणाले.यावर आ. बच्चू कडू म्हणाले की, जिथे कुणबी नोंदी सापडल्या आहेत तिथेच यादी लागेल, याद्या ग्रामपंचायतमध्ये लागल्या आहेत. गॅझेटचा विषय वेगळा आणि सग्या-सोयऱ्याचा विषय वेगळा. ज्या लोकांना कुणबी प्रमाणपत्र हवं आहे, त्यांना अर्ज करावाच लागेल, सही करावीच लागेल तरच त्यांना प्रमाणपत्र मिळेल.

# चिंता वाढली! मान्सूनच्या पावसात सातत्याने घट

## काही दशकांमध्ये काही भागात मान्सूनच्या पावसात घट झाली

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या काही दशकांमध्ये देशाच्या काही भागात मान्सूनच्या पावसात (MONSOON RAINFALL) घट झाली आहे. दिल्ली-आधारित ऊर्जा पर्यावरण आणि पाणी परिषदेने (CEEW) 40 वर्षांमध्ये मान्सूनमधील बदलांचे मूल्यांकन केले आहे. यामध्ये मिळालेल्या माहितीनुसार, इंडो-गंगेचे मैदान, ईशान्य भारत आणि हिमालयीन प्रदेशात गेल्या दशकात मान्सूनच्या पावसात 10 टक्क्यांची घट झाली आहे.**



अहवालानुसार, गेल्या 40 वर्षांमध्ये देशातील 30 टक्के जिल्ह्यांमध्ये वर्षानुवर्षे कमी पाऊस झाला आहे. नवी दिल्ली, बेंगळुरू, निलगिरी, जयपूर, कच्छ आणि इंदूरसह किमान 23 टक्के जिल्ह्यात अतिवृष्टी झाली आहे.ऊर्जा पर्यावरण आणि पाणी परिषदेने (CEEW) 40 वर्षांत मान्सूनमधील बदलांचे मूल्यांकन केले आहे. दरम्यान, जून-सप्टेंबरमध्ये नैऋत्य मोसमी पावसात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने 40 वर्षांत तालुक्यांमध्ये सुमारे 11 टक्के पाऊस झाला आहे. तर, सिंधु-गंगेच्या मैदानातील तहसील आणि विभागांमध्ये, ईशान्य भारत आणि हिमालयीन प्रदेशात, 2012-2022 या दशकात 1982-2011 च्या हवामान आधारभूत रेषेच्या तुलनेत 10 टक्के घट दिसून आली आहे.देशातील अंदाजे 68 टक्के तालुक्यांमध्ये मान्सूनच्या पावसाच्या पावसामध्ये घट झाली आहे. झाले. तर, 87 टक्के लोकांनी जून आणि जुलै या महत्त्वाच्या महिन्यांत मान्सूनच्या पावसात घट नोंदवली आहे. देशातील सर्व तालुक्यांपैकी जवळपास 64 टक्के तालुक्यांमध्ये गेल्या दशकात अतिवृष्टीच्या दिवसांमध्ये दरवर्षी 115 टक्के वाढ झाली आहे. हा नमुना सर्वाधिक देशांतर्गत उत्पादन असलेल्या राज्यांमध्ये, महाराष्ट्र, तामिळनाडू, गुजरात आणि कर्नाटकमध्ये ठळकपणे दिसून आला आहे. देशात गेल्या 40 वर्षांतील 29 वर्षांत जून-सप्टेंबरमध्ये 'सामान्य' पाऊस राहिला आहे. तर 9 वर्षांत 'सामान्यपेक्षा जास्त' आणि 3 वर्षांत 'सामान्यपेक्षा कमी' पाऊस पडला आहे. या कालावधीत, अंदाजे 30 टक्के जिल्ह्यांमध्ये वर्षानुवर्षे कमी पाऊस झाला आहे.

### 'या' राज्यात मान्सूनचा पाऊस वाढला

वर्षानुवर्षे अतिवृष्टी झाली. नवी दिल्ली, बंगळुरु, निलगिरी, जयपूर, कच्छ आणि इंदूरसह किमान 23 टक्के जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. गेल्या दशकातील हवामान बेसलाइन 2012-2022 दरम्यान, 55 टक्के तहसीलमध्ये 10 टक्के वाढ दिसून आली आहे. तर, राजस्थान, गुजरात, मध्य महाराष्ट्र आणि तामिळनाडूच्या काही भागात पावसाचे प्रमाण कमी झाले.ईशान्य मोसमी पावसात 2012 ते 2022 मध्ये तामिळनाडूच्या सुमारे 80 टक्के तालुक्यांमध्ये 10 टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे.

# भारत जोडो न्याय यात्रे विरोधात तक्रार

## मार्गात बदल केल्यामुळे आसाम पोलिसांची कारवाई

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**काँग्रेस नेते राहुल गांधी (RAHUL GANDHI) यांच्या 'भारत जोडो न्याय यात्रे'च्या (BHARAT JODO NYAY YATRA) विरोधात गुरुवार 18 जानेवारी रोजी आसाम (AASAM) पोलिसांनी तक्रार दाखल केलीये. पीटीआयने पोलीस अधिकाऱ्यांच्या हवाल्याने ही माहिती दिली आहे. दरम्यान या यात्रेच्या मार्गात बदल केल्याने पोलिसांनी ही तक्रार दाखल केल्याचं म्हटलं आहे. याच मार्गासंदर्भात आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी देखील इशारा दिला होता.**



राहुल गांधी यांची ही भारत जोडो न्याय यात्रा शहरांमधून काढण्यात आली. यावर आसामच्या मुख्यमंत्र्यांनी इशारा देत म्हटलं होतं की, शहरांच्या मध्यभागातून मार्ग काढू नका. तुम्ही जो पर्यायी मार्ग मागाल त्याला परवानगी दिली जाईल. पण जर शहरांच्या मधून जर यात्रा काढण्याचा हट्ट धरण्यात आला तर पोलिसांची फौज देखील तयार असेल.काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारत जोडो न्याय यात्रेचं आयोजन करण्यात आलं आहे. दरम्यान ही यात्रा आता नागालँडमधून आसाममध्ये पोहचलीये. याच वेळी राहुल गांधी यांनी आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्यावर निशाणा साधला होता. त्यांनी म्हटलं होतं की, कदाचित देशातलं सर्वात भ्रष्ट सरकार आणि सगळ्यात भ्रष्ट मुख्यमंत्री हे या राज्यांत आहे. काँग्रेसेचे नेते राहुल गांधी यांनी ट्वीट करत या संदर्भात भाष्य केलं. त्यांनी म्हटलं की, जेवढं प्रेम आम्हाला मणिपूर आणि नागालँडच्या लोकांकडून मिळालं. आमच्या या यात्रेचा मुख्य उद्देश हा तुमच्या अडचणी, तुमचे प्रश्न आणि तुमच्यावर होत असलेल्या अन्याय जवळून समजावून घेण्यासाठी आहे. यावेळी बोलताना राहुल गांधी यांनी आसामच्या मुख्यमंत्र्यांवर देखील निशाणा साधला. त्यांनी म्हटलं की, आसाम सरकार हे भाजपच्या रूपाने द्वेषाच्या खतातून जन्माला आलेले भ्रष्टाचाराचे पीक आहे. आसामचे मुख्यमंत्री हे भारतातील सर्वात भ्रष्ट मुख्यमंत्री आहेत, ज्यांचे काम केवळ द्वेषाच्या नावाखाली जनतेचा पैसा लुटणे आहे. पैशाची ताकद आसामच्या लोकांच्या शक्तीला कधीही पराभूत करू शकत नाही. आपल्याला या अन्यायाविरुद्ध लढायचे आहे आणि असा आसाम निर्माण करायचा आहे जिथे प्रत्येक हाताला रोजगार आहे आणि ज्याचे नैसर्गिक सौंदर्य आणि सांस्कृतिक वैभव नेहमीच समृद्ध राहते.राहुल गांधी यांची ही भारत जोडो न्याय यात्रा शहरांमधून काढण्यात आली. यावर आसामच्या मुख्यमंत्र्यांनी इशारा देत म्हटलं होतं की, शहरांच्या मध्यभागातून मार्ग काढू नका. तुम्ही जो पर्यायी मार्ग मागाल त्याला परवानगी दिली जाईल. पण जर शहरांच्या मधून जर यात्रा काढण्याचा हट्ट धरण्यात आला तर पोलिसांची फौज देखील तयार असेल.काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारत जोडो न्याय यात्रेचं आयोजन करण्यात आलं आहे. दरम्यान ही यात्रा आता नागालँडमधून आसाममध्ये पोहचलीये. याच वेळी राहुल गांधी यांनी आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्यावर निशाणा साधला होता. त्यांनी म्हटलं होतं की, कदाचित देशातलं सर्वात भ्रष्ट सरकार आणि सगळ्यात भ्रष्ट मुख्यमंत्री हे या राज्यांत आहे. काँग्रेसेचे नेते राहुल गांधी यांनी ट्वीट करत या संदर्भात भाष्य केलं. त्यांनी म्हटलं की, जेवढं प्रेम आम्हाला मणिपूर आणि नागालँडच्या लोकांकडून मिळालं. आमच्या या यात्रेचा मुख्य उद्देश हा तुमच्या अडचणी, तुमचे प्रश्न आणि तुमच्यावर होत असलेल्या अन्याय जवळून समजावून घेण्यासाठी आहे. यावेळी बोलताना राहुल गांधी यांनी आसामच्या मुख्यमंत्र्यांवर देखील निशाणा साधला. त्यांनी म्हटलं की, आसाम सरकार हे भाजपच्या रूपाने द्वेषाच्या खतातून जन्माला आलेले भ्रष्टाचाराचे पीक आहे.

### देशातलं सर्वात भ्रष्ट सरकार

.काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारत जोडो न्याय यात्रेचं आयोजन करण्यात आलं आहे.याच वेळी राहुल गांधी यांनी आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्यावर निशाणा साधला होता. त्यांनी म्हटलं होतं की, कदाचित देशातलं सर्वात भ्रष्ट सरकार आणि सगळ्यात भ्रष्ट मुख्यमंत्री हे या राज्यांत आहे. काँग्रेसेचे नेते राहुल गांधी यांनी ट्वीट करत या संदर्भात भाष्य केलं. यावेळी बोलताना राहुल गांधी यांनी आसामच्या मुख्यमंत्र्यांवर देखील निशाणा साधला.

# साध्वी निरंजन यांच्या अपहरणाचे षडयंत्र?

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

उत्तर प्रदेशमध्ये गुन्हेगारी कमी झाली आहे, असे दावे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ नेहमी करत असतात. मात्र मंगळवारी उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊ येथे एक धक्कादायक प्रकार घडला. केंद्रीय राज्यमंत्री साध्वी निरंजन ज्योती या त्यांच्या खासगी वाहनात बसल्याचे समजून त्यांच्या वाहनाचे अपहरण करण्याचा प्रयत्न झाला. लखनऊच्या बंथरा पोलिस ठाण्यात याबद्दल आता गुन्हा दाखल झाला आहे. चालकाच्या तक्रारीनुसार, निरंजन ज्योती यांना विमानतळावर घेण्यासाठी त्यांचा ताफा जात होता. यावेळी प्रचंड धुकं असल्यामुळे ताफा विमानतळाच्या अलीकडे प्रधान नामक ढाब्यावर थांबला होता. यावेळी तिथे एका व्यक्तीने गाडीत घुसून ती पळविण्याचा प्रयत्न केला.मंत्र्यांच्या गाडीचे चालक चेताराम हे कानपूरच्या मूसानगर भागात राहतात. त्यांनी तक्रारीत म्हटले की, आम्ही मंगळवारी केंद्रीय मंत्र्यांना आणण्यासाठी विमानतळावर जात होतो. सुरक्षा कर्मचाऱ्यांना चहा प्यायचा होता, तसेच प्रचंड धुकं असल्यामुळे आम्ही बंथरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या प्रधान ढाब्यावर थांबलो. यावेळी एक युवक अचानक मंत्र्यांच्या गाडीत घुसला आणि त्याने गाडी पळविण्याचा प्रयत्न केला. मात्र सुरक्षा कर्मचाऱ्यांनी वेळीच धाव घेत गाडीला घेरले आणि पळून जाणाऱ्या आरोपीला ताब्यात घेतले.

# क्लासेससाठी नव्या मार्गदर्शक सूचना

## 16 वर्षाखालील विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**खासगी कोचिंग सेंटर्सच्या (COACHING CENTRES) मनमानी कारभारावर लगाम लावण्यासाठी केंद्र सरकारने ( CENTRAL GOVERNMENT) पावले उचलली आहेत. कोचिंग क्लासेससाठी केंद्र सरकारकडून नव्या मार्गदर्शक सूचना ( CENTRAL GOVERNMENT GUIDELINES) जारी करण्यात आल्या आहेत.**



त्यानुसार 16 वर्षाखालील विद्यार्थ्यांना कोचिंग क्लासेसमध्ये प्रवेश देता येणार नाही. रँक, गुणांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे गॅरंटी देणे कोचिंग क्लासेसना महागात पडणार आहे. तसेच आग प्रतिबंधक उपाययोजना करणे सर्व क्लासेस ना बंधनकारक असणार आहे. केंद्र सरकारच्या नव्या नियमांनुसार कुणालाही खासगी कोचिंग सेंटर उघडता येणार नाही. त्यासाठी सर्वात आधी नोंदणी करावी लागेल. त्याशिवाय 16 वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना कोचिंग सेंटरमध्ये प्रवेश देता येणार नाही. त्याशिवाय कोटिंग सेंटर चालवणारे विद्यार्थ्यांकडून अव्वाच्या सव्वा फी वसूल करता येणार नाही. नियमावलीतील व्याख्येनुसार 50 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना जिथे शिक्षण दिले जाते त्या जागेला कोचिंग क्लास समजले जाईल.NEET अथवा JEE ची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून आत्महत्याचे प्रमाण वाढले आहे. त्याशिवाय खासगी कोचिंग क्लासमध्ये मनमानी फी आकारली जाते. त्यामुळे या सर्वांना लगाम लावण्यासाठी केंद्र सरकारकडून नियमावली जारी करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या नव्या नियमानुसार, आयआयटी जेईई, एमबीबीएस, नीट यासारख्या प्रोफेशनल कोर्सांठी कोचिंग सेंटरमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्याशिवाय सुरक्षासंदर्भात एनओसी असणंही बंधनकारक करण्यात आलेय. परीक्षा आणि त्याच्या निकालाच्या दबावाशी संबंधित समस्यांवर मात करण्यासाठी विद्यार्थ्यांना मानसिक आणि मानसिक आरोग्याशी संबंधित धडे आणि पाठबळ द्यावे, असेही नियमांत म्हटलेय.

# जुही चावलाची लेक दिसते फारच सुंदर

आपलं सौंदर्य आणि दमदार अभिनयाने ९० च्या दशकात प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री म्हणजे जुही चावला होय. जुहीने आपल्या करिअरमध्ये एकापेक्षा एक अनेक सुपरहिट चित्रपट दिले. आता ती फारसे चित्रपट करत नसली तरी सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. जुहीने उद्योगपती जय मेहता यांच्याशी लग्न केलंय. जय व जुही यांना जान्हवी व अर्जुन नावाची दोन अपत्ये आहे. जुहीची लेक जान्हवी २३ वर्षांची आहे. आई अभिनेत्री असली तरी जान्हवीला मात्र अभिनय क्षेत्रात करिअर करायचं नाही. जान्हवी मेहता अभ्यासात प्रचंड हुशार असून तिने मे २०२३ मध्ये कोलंबिया विद्यापीठातून ग्रॅज्युएशन पूर्ण केलंय. जान्हवीला अभिनेत्री व्हायचं नाही. तिला क्रिकेटची खूप आवड आहे आणि तिला लेखिका व्हायचं आहे. तसेच जान्हवीला पुस्तकं वाचायला खूप आवडतं, असं तिच्या आईने सांगितलं होतं.जुही चावलाने न्यूज १८ ला दिलेल्या मुलाखतीदरम्यान सांगितलं होतं की, बॉलीवूडमध्ये काहीतरी मोठं करण्याची स्पर्धा स्टार किड्समध्ये सुरू असताना दुसरीकडे तिची मुलगी जान्हवी मेहताला लाइमलाइटपासून दूर राहायला आवडतं. "स्वतःच्या मुलांचे कौतुक करू नये, पण ती एक हुशार मुलगी आहे आणि तिचा शैक्षणिक रेकॉर्डही खूप चांगला आहे. इंटरनॅशनल जनरल सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशनमध्ये तिने जबरदस्त कामगिरी केली आहे. तिने हिस्ट्री इन इंडियामध्ये अव्वल स्थान पटकावले होते. ती त्याच्या शाळेत पहिली आली होती, असं जुही चावला म्हणाली होती. याशिवाय जुही चावलाने खुलासा केला होता की तिची मुलगी जान्हवी मेहताला क्रिकेट खूप आवडतं. "जेव्हा जान्हवी क्रिकेट आणि खेळाडूंबद्दल बोलते तेव्हा तिच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद दिसतो. कधी कधी मला प्रश्न पडतो की हे सर्व ज्ञान कुठून येतं. मलाही खूप आश्चर्य वाटतं, पण तिने हे स्वतःसाठी निवडलं आहे, त्यामुळे मी त्याचे श्रेय घेऊ शकत नाही," असं जुहीने सांगितलं होतं.जुही चावला पुढे म्हणाली, "ती (जान्हवी मेहता) त्या स्टार किड्सपेक्षा वेगळी आहे ज्यांना पडद्यावर स्वत:ला अभिनेता किंवा अभिनेत्री म्हणून बघायचं आहे.

# पत्नीच्या वाढदिवसानिमित्त आरबाज खानची रोमँटिक पोस्ट



बॉलीवूड अभिनेता आरबाज खानने गेल्यावर्षी दुसऱ्यांदा लग्नगाठ बांधली. प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट शूरा खानबरोबर अरबाज लग्नबंधनात अडकला. आरबाज व शूराच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. दरम्यान, शूराच्या वाढदिवसानिमित्त आरबाजने रोमँटिक पोस्ट शेअर केली आहे. आपल्या इन्स्टाग्रामवर आरबाजने शूराबरोबरचा एक फोटो शेअर केला आहे. हा फोटो शेअर करत त्याने लिहिले, "माझी प्रिय शूरा, तुला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा. तुझ्याइतके मला कोणीही हसवत नाही. मला म्हातारपणापर्यंत तुझ्याबरोबर राहायचे आहे. आपण एकत्र येणे ही माझ्या बाबतीत घडलेली सर्वात चांगली गोष्ट आहे."आरबाजने पुढे लिहिलं, "जेव्हा मी पहिल्यांदा तुझ्यासोबत डेटला गेलो होतो, तेव्हाच मला जाणवलं होतं की, मी माझं संपूर्ण आयुष्य तुझ्यासोबत घालवणार आहे. तू नेहमी तुझ्या सौंदर्याने आणि दयाळूपणाने मला आश्चर्यचकित करते. जेव्हा मी तुझ्यासाठी कबूल है म्हणालो, हे शब्द माझ्या आयुष्यातील सगळ्यात चांगले शब्द होते,आरबाजची ही पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. अनेक चाहत्यांनी या पोस्टवर कमेंट करत शूराला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. गेल्या वर्षी २४ डिसेंबरला आरबाज आणि शूराचा लग्नसोहळा पार पडला. आरबाज खानची बहीण अर्पिता खानच्या घरी या लग्नसोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या लग्नाला रवीना टंडन, रितेश देशमुख, जेनेलिया डिसूझा, फराह खान, साजिद खान यांच्यासह अनेक कलाकारांनी हजेरी लावली होती.

# अबू सालेमच्या आवाजाच्या प्रेमात

बॉलीवूडमधील एक अभिनेत्री जिच्या सौंदर्याने चाहत्यांना अक्षरशः वेड लावलं होतं. या अभिनेत्रीला प्रेम करणं इतकं महागात पडलं की तिचं करिअरच संपलं. ही अभिनेत्री अंडरवर्ल्ड डॉन अबू सालेमच्या प्रेमात पडली आणि त्याचे दुष्परिणाम तिला भोगावे लागले. तिला तुरुंगातही जावं लागलं. ही अभिनेत्री म्हणजे मोनिका बेदी होय. आज मोनिकाचा वाढदिवस आहे, त्यानिमित्ताने तिने एका मुलाखतीत तिच्या वादग्रस्त लव्ह लाइफबद्दल काय म्हटलं होतं, ते जाणून घेऊयात.'ताजमहल' या तेलुगू चित्रपटातून आपल्या करिअरची सुरुवात करणारी मोनिका दिसायला खूपच सुंदर होती. तिच्या सौंदर्याने प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं होतं. तिने बॉलीवूडसह दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये काम केलं.

# आलियाची परवानगी का?



या सिनेमाने छप्परफाड कमाई केली. अनेकांनी या सिनेमावर टीकाही केली तर काही जणांनी या सिनेमाची स्तुती केली. सिनेमाने कोट्यवधी रुपये कमवले आहेत. सिनेमात ॲक्शन सीन आणि इंटिमेट सीनही आहेत. रणबीर कपूर आणि तृप्ती डिमरी यांच्या इंटीमेट सीनची चर्चाही झाली. या इंटीमेट सीनसाठी आलिया भटने परवानगी दिली होती का? यावर रणबीर कपूरने उत्तर दिलं आहे.आहे. जनसत्तानं याबाबत अधिकृतरीत्या माहिती देणारे वृत्त दिले आहे.ॲनिमल या सिनेमात रणबीर कपूर, रश्मिका मंदाना आणि तृप्ती डिमरी यांच्या भूमिका आहेत. तृप्ती डिमरी आणि रणबीर कपूर या दोघांचे इंटीमेट सीन चर्चेत आले होते. भाभी २ हे सिनेमातलं तिचं नाव ट्रेंडमध्येही आलं होतं. या सीनच्या चित्रिकरणाच्या वेळी पाचच लोक उपस्थित होते. मात्र रणबीरने याबाबत जे भाष्य केलं आहे त्यामुळे या सीनची आणि सिनेमाची आठवण अनेकांना झाली आहे. तृप्ती डिमरीबरोबरच्या सीनसाठी आलियाची परवानगी घेतली होती का? यावर रणबीर कपूर म्हणाला, "मी खरंतर हा सीन करताना थोडा घाबरलो होतो. पण आलियाने पत्नी म्हणून मला सपोर्ट केला. आम्ही दोघंही एकमेकांच्या कामाबाबत ॲनिमलच्या शूटिंग दरम्यान तृप्ती डिमरीसह इंटीमेट सीनबाबत मी सांगितलं होतं.

# घटस्फोटाच्या चर्चादरम्यान ईशा देओलची 'ती' पोस्ट चर्चेत

ईशा देओल बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री पैकी एक आहे. आपल्या अभिनयाच्या जोरावर ईशाने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले. सध्या ईशा अभिनयापासून लांब असली तरी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणत सक्रिय असते. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करत ती चाहत्यांना अपडेट देत असते. अभिनयाव्यतिरिक्त ईशा आपल्या व्यक्तिक आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असते. काही दिवसांपूर्वीच ईशा तिचा पती भरत तख्तानीपासून विभक्त झाली असल्याची बातमी समोर आली होती. फ्री प्रेस जर्नल'ने याबाबत एक बातमी प्रसिद्ध केली होती या बातमीनुसार एका सोशल मीडिया युजरने आपल्या पोस्टमध्ये ईशा व भरत एकमेकांपासून वेगळे झाले असल्याचे सांगण्यात



आले होते. एवढचं नाही तर भरत आपली पत्नी ईशाची फसवणूक करत असल्याचा दावा करण्यात आला होता. या घटस्फोटाच्या चर्चादरम्यान ईशा देओलने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमुळे अनेक तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.ईशा देओलने तिचा पहिला बॉलीवूड चित्रपट 'कोई मेरे दिल से पूछे'ला २२ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल इंस्टाग्राम अकांउटवर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. या चित्रपटातील 'लपाक-झपाक' या गाण्याचा व्हिडिओ तिने शेअर केला आहे. ईशाने या व्हिडीओबरोबर लिहिलेल्या कॅप्शनने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. ईशाने लिहिले- 'कधीकधी तुम्ही गोष्टी सोडून द्यायला हव्यात आणि फक्त तुमच्या हृदयाच्या ठोक्यावर नाचायला हवं. माझ्या पहिल्या चित्रपटाच्या आणि मी १८ वर्षांची असतानाच्या आठवणी. गेल्या गुरूवारी ११ जानेवारीला माझ्या पहिल्या चित्रपटाला २२ वर्षे पूर्ण झाली. हा चित्रपट माझ्या नेहमीच लक्षात राहतो कारण हा माझा पहिला चित्रपट आहे."ईशा देओलने २९ जून २०१२ रोजी बिझनेसमन भरत तख्तानीशी लग्नगाठ बांधली. ईशा व भरत यांना राध्या व मिराया नावाच्या दोन मुली आहेत.

# महाराष्ट्राच्या दोन्ही संघांची विजयी सलामी

## युथ गेम्स 2024, - मुलींची तेलंगणावर, तर मुलांची बिहारवर मात

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**महाराष्ट्राच्या दोन्ही कबड्डी संघांनी आपल्या लौकिकास साजेसा खेळ करताना ६व्या खेलो इंडिया युथ गेम्समध्ये गुरुवारी विजयी सलामी देत धडाकेबाज सुरूवात केली. महाराष्ट्राच्या मुलींनी पहिल्या लढतीत तेलंगणाची ६६-१४ अशी दाणादाण उडविली, तर महाराष्ट्राच्या मुलांनी बिहारचा ४८-१९ अशा फरकाने धुव्वा उडविला. आज झालेल्या सलामीच्या लढतीमध्ये मुलींच्या गटात हरियाणाने सलामीच्या लढतीत तमिळनाडूवर ४१-२० अशी २१ फरकाने मात केली, तर मुलांच्या गटात राजस्थानने मध्यप्रदेशवर ५८-२३ असा ३५ गुणांच्या फरकाने विजय मिळविला.**





चेन्नईतील जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियमध्ये आजपासून खेलो इंडिया युथ गेम्समधील कबड्डी स्पर्धेला प्रारंभ झाला. मात्र, स्पर्धेचे उद्‌घाटन उद्या शुक्रवारी (दि.१९) होणार आहे. महाराष्ट्राच्या मुलींच्या आक्रमक खेळापुढे तेलंगणाच्या मुली निष्प्रभ ठरल्या. महाराष्ट्राची कर्णधार हरजित कौर संधू हिने अष्टपैलू खेळ करीत आपल्या नेतृत्वाला साजेसा खेळ केला. याचबरोबर समृद्धी मोहिते व आर्या पाटील यांनी खोलवर चढाया करीत गुणांचा सपाटा लावला, तर कल्याणी कडोले व भूमिका गोरे यांनी सुरेख पकडी करीत त्यांना उत्तम साथ दिली. मध्यंतराला महाराष्ट्राच्या मुलींकडे ३५-६ अशी मोठी आघाडी होती. मध्यंतरानंतर देखील हेच चित्र पहायला मिळाले. त्यामुळे महाराष्ट्राच्या मुलींनी तेलंगणावर ६६-१४ अशी तब्बल ५२ गुण फरकाने बाजी मारली.

दुसरीकडे, महाराष्ट्राच्या मुलांनीही प्रतिस्पर्धी बिहार संघाला सर्वच आघाड्यांवर नामोहरम केले. गजानन कुरे व क्षितीज ठोंबरे यांच्या चौफेर चढाया आणि कर्णधार अजून गावडे व विशाल ब्राम्हणे यांच्या देखण्या पकडींपुढे बिहारच्या खेळाडूंकडे उत्तर नव्हते. त्यात वरूण खंडागळेने अष्टपैलू कामगिरी करीत आपली उपयुक्तता सिद्ध केली. महाराष्ट्राने वेगवान खेळ करीत मध्यंतरापर्यंतच २८-८ अशी जोरदार मुसंडी मारली होती. मध्यंतरानंतर बिहारच्या खेळाडूंनी थोडाफार प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, महाराष्ट्राने मध्यंतरापूर्वीच ४, तर मध्यंतरानंतर २ लोण चढवत बिहारवर ४८-१९ असा २९ गुणांच्या फरकाने विजय मिळवित आगेकूच केली. महाराष्ट्राच्या दोन्ही कबड्डी संघांनी आपल्या लौकिकास साजेसा खेळ करताना ६व्या खेलो इंडिया युथ गेम्समध्ये गुरुवारी विजयी सलामी देत धडाकेबाज सुरूवात केली. महाराष्ट्राच्या मुलींनी पहिल्या लढतीत तेलंगणाची ६६-१४ अशी दाणादाण उडविली, तर महाराष्ट्राच्या मुलांनी बिहारचा ४८-१९ अशा फरकाने धुव्वा उडविला. आज झालेल्या सलामीच्या लढतीमध्ये मुलींच्या गटात हरियाणाने सलामीच्या लढतीत तमिळनाडूवर ४१-२० अशी २१ फरकाने मात केली, तर मुलांच्या गटात राजस्थानने मध्यप्रदेशवर ५८-२३ असा ३५ गुणांच्या फरकाने विजय मिळविला.

### आजच्या लढती महत्वाच्या...

मुलांच्या गटातून महाराष्ट्राने बिहार संघाला तर मुलींच्या गटातून तेलंगाना संघाला पराभूत केले आहे. उद्या मुलांच्या गटात राजस्थान संघाचे तर मुलींच्या गटात हरयाणा संघाचे आव्हान असणार आहे. उद्याचे दोन्ही संघांनी पहिल्या दिवशी दमदार कामगिरी बजावली आहे. त्यामुळे उद्या महाराष्ट्राच्या दोन्ही संघांच्या कामगिरीकडे कबड्डीप्रेमींच्या नजरा असतील.

# भारत-अफगाणिस्तान सामन्यात झाल्या दोन सुपरओव्हर

## विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघ सज्ज असल्याचं बोललं जात आहे

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नुकतीच संपलेली अफगाणिस्तानविरुद्धची टी-२० मालिका भारतीय संघासाठी आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धेपूर्वीची शेवटची मालिका होती. या मालिकेत भारतीय खेळाडूंना विश्वचषक स्पर्धेसाठी दावेदारी सिद्ध करण्याची संधी देण्यात आली. भारतीय संघानं दमदार कामगिरी करत मालिका खिशात घातली. त्यामुळे विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघ सज्ज असल्याचं बोललं जात आहे.**




तुलनेनं दुबळ्या अफगाणिस्तान संघाविरुद्ध तीन सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा सामना, त्यातही सामन्याचा शेवट मोठा रंजक ठरला. आधी टाय, नंतर पहिली सुपरओव्हर आणि शेवटी दुसऱ्या सुपर ओव्हरनंतर या सामन्याचा निकाल लागला. क्रिकेट चाहत्यांसाठी निव्वळ औपचारिकता ठरलेल्या या सामन्याचा शेवट मोठा अनपेक्षित असाच ठरला! भारतीय संघाचं २१३ धावांचं लक्ष्य अफगाणिस्तानच्या फलंदाजांनी सर्व आडाखे फोल ठरवत जवळपास पार केलं होतं. पण विजयासाठी आवश्यक असलेली एक धाव करण्यात अफगाणिस्तानच्या फलंदाजांना यश आलं नाही. त्यामुळे सामन्यात सुपर ओव्हर खेळवावी लागली. पण तीही टाय झाल्यामुळे पुन्हा दुसरी सुपर ओव्हर खेळवली गेली. यावेळी मात्र भारतानं बाजी मारली आणि सामन्याचा निकाल भारताच्या बाजूने लागला. अफगाणिस्तानचा डाव २१३ धावांवर आटोपल्यानंतर सुपर ओव्हरमध्ये अफगाणिस्तानने पहिली फलंदाजी करताना १६ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल रोहित शर्मा-यशस्वी जैस्वाल जोडीनं फटकेबाजी केली खरी. पण रोहित शर्मा रिटायर्ड आऊट झाला. भारतालाही १६ धावाच करता आल्या. दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये रोहितसह रिंकू सिंह खेळायला उतरले. भारतानं या ओव्हरमध्ये १२ धावा केल्या. यावेळी मात्र अफगाणिस्तानचे फलंदाज सहा चेंडूंत फक्त २ धावा करू शकले आणि भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब झालं. आता या दोन सुपरओव्हरवर चर्चा सुरू झाली आहे. आत्तापर्यंत एकच सुपरओव्हर ऐकिवात असताना दोन सुपर ओव्हर खेळवल्या गेल्यामुळे तो चर्चेचा विषय ठरला. अशा प्रकारे दोन सुपर ओव्हर खेळवता येतात का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे यासंदर्भात ICC ची नियमावली नेमकं काय सांगते, हे पाहाणं महत्त्वाचं ठरेल.

### सुपर ओव्हर खेळवली जाऊ शकते

या नियमावलीतील १६.३.१ कलमान्वये जर एखादा सामना टाय झाला तर सामन्याचा निकाल घेण्यासाठी सुपर ओव्हर खेळवली जाते. सुपर ओव्हर म्हणजे सोप्या शब्दांत ६ चेंडूंचा सामना. या षटकातही दोन्ही बाजूच्या फलंदाजांना सारख्याच धावा करता आल्या, तर पुन्हा सुपर ओव्हर खेळवली जाऊ शकते.